**ठळक बातम्या**

- अवकाळी पाऊस आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्याची केंद्राकडे २९ हजार कोटी रुपयांची मागणी, पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर

- ओसी प्रलंबित असलेल्या मुंबईतल्या इमारतींसाठी राज्य सरकारकडून अभय योजना जाहीर, पागडी इमारतींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र नियमावली

- मुख्यमंत्र्यांकडून मंत्र्यांच्या भ्रष्टाचारावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा उद्धव ठाकरे यांचा आरोप

**आणि**

- कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी प्राडाचा लिडकॉम आणि लिडकार यांच्याबरोबर करार

**<><><><><>**

राज्यातल्या अवकाळी पाऊस आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्राकडे २९ हजार कोटी रुपयांची मदत मागितली आहे. राज्य सरकारनं आतापर्यंत ४४ हजार कोटी रुपये दिले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. केंद्राची मदत लवकरच मिळण्याची आशा असून दुसरं पाहणी पथक येत्या आठवड्यात येण्याची शक्यता असल्याचं ते म्हणाले. पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. यानंतर सुमारे 75 हजार कोटींच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर झाल्या.

राज्यात वित्तीय शिस्त ठेवण्याचा, उत्पन्नाचे स्त्रोत वाढवण्याचा, राजकोषीय तूट ३ टक्क्यांच्या आत ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे असंही ते म्हणाले. महाराष्ट्रासह केवळ ३ राज्यांना कर्जाचं प्रमाण २० टक्क्यांच्या आत ठेवण्यात यश आल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना शेततळी, अवजार खरेदी आणि इतर गरजांच्या मदतीसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही आणि एकही शेतकरी लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधानपरिषदेत दिली. गेल्या ४ वर्षांपासून विविध प्रकारच्या मदतीसाठी शेतकऱ्यांनी केलेले सुमारे ४८ लाख अर्ज कारवाईविना पडून असल्याबाबत रणजीतसिंग मोहिते पाटील, संजय खोडके, शशिकांत शिंदे आणि इतरांनी विचारलेल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते. कृषी समृद्धी योजनेसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबईतल्या सुमारे २० हजार इमारतींना नियमित करण्यासाठी 'सुधारीत भोगवटा अभय योजना' लागू करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केली. गेली अनेक वर्ष ओसी, म्हणजेच भोगवटापत्रापासून वंचित असलेल्या दहा लाखांपेक्षा जास्त मुंबईकरांना यामुळे दिलासा मिळणार आहे. या योजनेमुळे या इमारतींना आता दुप्पट मालमत्ता कर भरावा लागणार नाही, घरांच्या खरेदी-विक्रीसाठी बँकांकडून सहज कर्ज मिळेल, घरांना योग्य किंमत मिळेल, आणि पुनर्विकासात या इमारतींना त्यांच्या संपूर्ण क्षेत्राचा लाभ घेता येईल. तसंच एखाद्या इमारतीमधल्या केवळ एका सदनिकाधारकाला वैयक्तिकरित्या ओसी हवी असेल, तर त्यासाठी स्वतंत्र कार्यप्रणाली सुरू करण्याच्या सूचना महापालिकेला देण्यात आल्याचं ते म्हणाले.

**‘होल्ड बाईट’ (२८ सेकंद)**

मुंबईच्या धर्तीवर राज्यातल्या अन्य महापालिकांमध्ये देखील  या धोरणाची अंमलबजावणी करण्याची शासनाची योजना असून याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना नगरविकास विभागाला देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी तसंच पागडी इमारतींचा न्याय्य पुनर्विकास करण्यासाठी शासन स्वतंत्र नियमावली करणार असल्याची घोषणाही त्यांनी आज केली. यामध्ये भाडेकरू आणि घरमालकांचा हक्क अबाधित ठेवला जाईल, असं ते यावेळी म्हणाले.

कापड गिरण्यांच्या जमिनींवरील जुन्या चाळींच्या पुनर्विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी नियमावलीमध्ये फेरबदल करण्याचा निर्णय झाल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

पुणे महानगर क्षेत्रात २२० प्रकल्पांतर्गत विविध विकासकामं हाती घेण्यात आली असून त्यासाठी ३२ हजार ५२३ कोटीं रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. पुणे महानगर नियोजन समितीच्या पाचव्या सभेत ते बोलत होते.

<><><><><>

"मदत माश" जमिनींबाबतचं विधेयक आज विधानसभेत एकमताने मंजूर झालं. मराठवाड्यात आणि चंद्रपूर जिल्ह्यातल्या राजुरा भागात सुमारे ७० हजार कुटुंबांना या सुधारणेचा फायदा होणार आहे. निजामाच्या राजवटीत इनाम म्हणून मिळालेल्या "मदतमाश" जमिनीवरची घरं भोगवटादारांच्या मालकीची नव्हती. या जमिनींवर कर्ज मिळवता येत नसे,किंवा त्या हस्तांतरित करता येत नसत. अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधेयक मांडताना दिली.

राज्यातल्या देवस्थानांच्या जमिनींबाबत श्वेतपत्रिका काढाव्या अशी मागणी काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी चर्चेदरम्यान केली. मुंढवा जमीन प्रकरणात महार वतनी जमिनीची हेराफेरी झाली, त्यावर पुढे कारवाई झाली नाही असं ते म्हणाले. त्याचप्रमाणे देवस्थानच्या ५० टक्के जागांमधे हेराफेरी झाल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

देवेंद्र फडनवीस यांच्याकडून मंत्र्यांच्या भ्रष्टाचारावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला. नागपुरात ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. राज्य सरकारनं शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजचं पुढं काय झालं असा सवाल त्यांनी केला. विरोधी पक्षनेत्याची घोषणा होत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

**होल्ड - उद्धव ठाकरे बाइट (२० सेकंद)**

घटनाबाह्य असलेलं उपमुख्यमंत्रीपद काढून टाकावं अशी मागणी त्यांनी केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत गुंडागर्दी सुरू आहे, बंदुकांचा वापर होतोय, पैशांचं वाटप केलं जातंय, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

शेतकऱ्यांसाठी सरकारनं जाहीर केलेल्या ३२ हजार कोटींच्या पॅकेजमधले १४ हजार कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपुरात दिली. शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत या उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्याचा समाचार त्यांनी घेतला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अजित पवार उपमुख्यमंत्री होते, याची आठवण त्यांनी करुन दिली.

**<><><><><>**

टीईटीसंदर्भात अनेक शिक्षकांना येणाऱ्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी शिक्षकांची एक समिती स्थापन करणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत केली.

**<><><><><>**

मुंबई पोलीस दलातल्या कॉन्स्टेबल्सना आता ५० चौरस मीटरची शासकीय निवासस्थानं मिळणार आहेत. आतापर्यंत त्यांना ४५ चौरसमीटर क्षेत्रफळाची घरं मिळू शकत होती. मुंबईबाहेर राज्यात सर्वत्र कॉन्स्टेबल्सना ५० चौरस मीटरची घरं

मिळत होती. या सुधारणेची अधिसूचना आज जारी झाल्याचं गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्याच्या उद्देशानं जागतिक ब्रॅन्ड प्राडा नं लिडकॉम आणि लिडकार यांच्याबरोबर सामंजस्य करार केला आहे. इटली–भारत व्यापारी परिषदेनिमित्त या करारावर स्वाक्षरी झाली. यानिमित्तानं पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक लक्झरी फॅशनच्या मदतीनं पारंपरिक कोल्हापुरी कौशल्याला प्राडाची आधुनिक साथ मिळणार आहे. या विशेष कोल्हापुरी चप्पला फेब्रुवारी २०२६ मध्ये प्राडाच्या ४० विक्री केंद्रांत तसंच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

**<><><><><>**

ज्येष्ठ लेखक अनिल मधुसूदन कालेलकर यांचं आज मुंबईत अल्पशा आजारानं निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. त्यांनी २५ हून अधिक हिंदी, मराठी आणि गुजराती चित्रपटांसंह अनेक मालिकांचं लेखनही केलं. त्यांनी लिहिलेल्या ‘बंदिनी’, ‘परमवीर’ आणि ‘हॅलो इन्स्पेक्टर’ या तीनही मालिकांना लागोपाठ तीन वर्षे सर्वोत्कृष्ट मालिकेचे पारितोषिक मिळाले होते.

**<><><><><>**

होर्डिंग्स आणि बिलबोर्ड्स लावण्यासाठी परवाना शुल्क किंवा नूतनीकरण शुल्क आकारणे आणि त्यांचं नियमन करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाकडे असल्याचं मुंबई उच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. या शुल्काच्या विरोधात केलेली याचिका फेटाळताना न्यायमूर्ती जी एस कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या पिठानं हा निर्णय दिला.

**//<><><><><>//**